# जाहीर नोटीस(१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट १) - मिळकतीचे वर्णन** - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे थेरगाव येथील स.नं. २२/५/१/१पै. सि.स.नं. २४२० पै.** मधील **श्री. सुनिल बारकू बारणे** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील २४.० मी. रस्त्याने बाधित **५४५.१८ चौ.मी.** क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - सि.स.नं. २४२० पैकी ची मिळकत.

पश्चिम - सि.स.नं. २४२१ पैकी ची मिळकत.

उत्तर - स.नं. २२ पैकी ची मिळकत.

दक्षिण - लागु रस्ता.

**परिशिष्ट २) - मिळकतीचे वर्णन** - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे दापोडी येथील स.नं. २२ हिस्सा नं. ५** मधील **मे. गणेश असोसिएट्स तर्फे भागीदार श्री. सतीश बसवंत पाटील** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १२ मी. बाधित क्षेत्र २७१.५५ चौ.मी. व उर्वरित बांधकामास अयोग्य २४०.६२ चौ.मी. असे एकूण ५१२.१७ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

१) मौजे दापोडी स.नं. २२/५ मधील १२.० मी. रस्ता व बांधकाम अयोग्य क्षेत्र (२७१.५५ चौ.मी. + २२८.१२ चौ.मी.)

उत्तर - स.नं. २२ पैकी ची मिळकत.

पुर्व - स.नं. २० ची मिळकत.

दक्षिण - स.नं. २१ ची मिळकत

पश्चिम - स.नं. २२/५ पैकी रस्ता

१) बांधकाम अयोग्य क्षेत्र (१२.५० चौ.मी.)

उत्तर - स.नं. २२ पैकी ची मिळकत.

पुर्व - स.नं. २२/५ पैकीची मिळकत.

दक्षिण - स.नं. २१ ची मिळकत

पश्चिम - स.नं. २२/४ ची मिळकत

# जाहिर नोटीस(२)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजेमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट –१)

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रहाटणी येथील स.नं. ८०।१।१ पैकी श्री. शंकर धोंडीबा मोहोळ व इतर करीता कुलमुखत्यारधारक श्री. मंगेश शांताराम कदम यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करणेत आलेल्या क्षेत्रातील ४५.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र २५०.९३ चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

पूर्वेस- स.नं. ८० पैकी, सौ. अर्पिता मंगेश कदम (कुलमुखत्यारधारक) यांची मिळकत.
पश्चिमेस – लागु थेरगावची शीव.
दक्षिणेस- स.नं. ८० पैकी, सौ. प्रतिभा प्रमोद ताम्हणकर (कुलमुखत्यारधारक) यांची मिळकत.
उत्तेरस- स.नं. ८० पैकी, उर्वरीत क्षेत्र .

परिशिष्ट –२)

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानहरपालिका हद्दीतील मौजे सांगवी येथील स.नं. ९ क पै. मधील श्रीमती यशोदाबाई शिवाजीराव ढोरे व श्री. पारस शिवाजीराव ढोरे तर्फे कु.मु.धारक मे. चंद्ररंग डेव्हलपर्स अँन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर श्री. विजय पांडुरंग जगताप यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ९.० मी. चे दोन व १८.मी. चा एक रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र ४२९९.९९ चौ मी क्षेत्र जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा – मौजे सांगवी स.नं. ९ क पै. ९.० मी. चे दोन व १८.मी. रस्ताबाधीत क्षेत्र ४२९९.९९ चौ.मी.

उत्तरेस – लागू रस्ता

पूर्वेस - स.नं. ९ पै. मिळकत

दक्षिणेस – स. नं. ११व स.नं. ९ पै. मिळकत

पश्चिम - स.नं. ९ पै. मिळकत

# जाहीर नोटीस (३)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हिंतसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पुनावळे येथील स.नं. ३५/१/५ पैकी मधील श्री. दत्तात्रय धोंडीबा भोजणे, वैजिनाथ दगडू गोरे व डॉ. सुभाष रामचंद्र दिवेकर यांचे मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र २९.३२ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - स.नं. ३५ पैकीची मिळकत.

पश्चिम - स.नं. ३५ पैकीची मिळकत.

उत्तर - जागेवरील रस्ता.

दक्षिण - स.नं. ३५ पैकीची मिळकत.

उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्रमांक ६९१९८
दिनांक ९३/९२/९८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.